आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद
# School Leadership Academy, Maharashtra
## मोड्यूल क्र.२४
## महाराष्ट्रातील ग्रामीण भागात लोकसहभागातून (CSR) विद्यार्थी गुणवत्ता विकासात शालेय नेतृत्वाची भूमिका
## Leadership Role in Quality Development of Students in Rural Areas of Maharashtra Through CSR / Public Participation



**प्रस्तावना :-**

शिक्षणाचा मूळ हेतू बालकाच्या अंगी असलेले सुप्त गुण व कौशल्यांचा शोध घेणे आणि या कौशल्य विकासासाठी पूरक वातावरणाची निर्मिती करणे व त्याद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हा आहे. याचा अर्थ असा होतो की बालकांचा, पर्यायाने समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचे शिक्षण हेच प्रभावी माध्यम आहे. शिक्षण देणारे प्रमुख केंद्र शाळा आहे. सर्वसामान्यपणे महाराष्ट्रात ग्रामीण भागात शिक्षणाची सोय फक्त शासकीय शाळेत असते आणि ती शाळा म्हणजे जिल्हा परिषदेची शाळा. प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेतच उपलब्ध असते. बालकाचा सर्वांगीण विकास साधणाऱ्या आणि समाजपरिवर्तनाचे केंद्र असणाऱ्या अशा या शाळेचा प्रमुख व महत्त्वपूर्ण घटक म्हणजे मुख्याध्यापक होय. जसे मुख्याध्यापक तशी शाळा, असे म्हटले जाते. शाळेचा प्रमुख घटक म्हणून मुख्याध्यापक, अध्यापक, प्रशासक, व्यवस्थापक, नियंत्रक अशा विविध भूमिका पार पाडत असतो. शैक्षणिक प्रक्रियेत जे मुख्याध्यापक जास्तीत जास्त लोकांचा सहभाग मिळविण्यात यशस्वी होतात त्या मुख्याध्यापकाचे नेतृत्व यशस्वी मानले जाते.उत्तम नेतृत्व करणे ही प्रयत्नसाध्य गोष्ट आहे.शाळा आणि समाज यांच्यामध्ये बऱ्याचदा एक अदृश्य अशी भिंत असते ती दूर होत गेली तर समाजाची शाळेप्रति असणारी आत्मीयता वाढत जाते आणि त्यातून शाळेचा चांगला विकास होऊ लागतो. शाळा जेव्हा गावाशी पूर्णपणे जोडली जाते तेव्हा मदतीचे असंख्य हात पुढे उभे राहतात.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची सुरुवात झाल्यापासून शाळातील शैक्षणिक दर्जा, भौतिक सोयीसुविधा, शिक्षकांच्या प्रशिक्षणाची गुणवत्ता आणि समाजाचा सहभाग या सर्वच बाबींवर विशेष लक्ष दिल्यामुळे बऱ्याच शाळांमध्ये

बदल होत असल्याचे लक्षात येत आहे. शिक्षक शाळेतील विद्यार्थी संख्या वाढण्यासाठी प्रयत्न करत आहेत. अध्ययन अध्यापनात विविधता, मनोरंजकता आणण्यासाठी समाज सहभाग मिळवून विविध शैक्षणिक साहित्य, आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून विद्यार्थ्यांना अधिकाधिक देण्याचा प्रयत्न शिक्षक करीत आहेत. यामुळे शिक्षकांच्या प्रति समाजाला वाटणारा हा विश्वास,जवळीक खूप महत्त्वाची आहे. समाज सहभागामुळे शाळेचं रूप पालटतांना आपल्याला दिसत आहे.

शालेय परिसर स्वच्छ, सुंदर व बोलका करण्यासाठी आर्थिक मदतीसोबतच श्रमाची सुध्दा गरज असते. समाज सहभाग केवळ सधन वर्गाकडून किंवा संस्थांकडूनच मिळतो असे नाही, आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शिक्षक जर तळमळीने काम करत असतील, शाळा प्रगत होत असेल तर गरीब, मोलमजुरी करणारे पालकही शाळेसाठी योगदान देतात. मग तो श्रमाच्या स्वरुपात, रंगरंगोटी करून देणे, शाळेच्या परसबागेत काम करणे, शालेय परिसराची स्वच्छता करणे आणि वस्तूंच्या स्वरुपात सुद्धा पालक शाळेला मदत करतात. वाढत्या समाज सहभागामुळे शाळेत भौतिक सुविधा, आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध होऊ शकते, तसेच गावातील विविध कला गुणात पारंगत असलेले पालक किंवा इतर व्यक्ती यांचे मार्गदर्शन मिळते त्यामुळे निश्चितच शाळेची प्रगती आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीला नक्कीच मदत होते.

**विषय निवडण्यामागची कारणे :-**

मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत शाळा व शाळेच्या परिसराचा खूप मोठा वाटा असतो. मुलांच्या विचारांना आकार देणारी सर्जनशीलतेला वाव देणारी, मुलांमध्ये जिज्ञासा जागृत करणारी, विद्यार्थ्यांच्या बौद्धिक,मानसिक व शरीरिक वाढीला पूरक अशी जागा म्हणजे शाळा असते. त्यामुळे शालेय परिसर व शालेय वातावरण मुलांच्या अध्ययनासाठी पोषक असणे आवश्यक असते. शिक्षण विभागात काम करत असतांना शाळा भेटी दरम्यान असे लक्षात आले की शाळेतील मुख्याध्यापकांना,शिक्षकांना तसेच विद्यार्थ्यांना शाळेतील भौतिक सुविधांबाबत अनेक अडचणी येतात. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, शारीरिक, मानसिक किंवा भावनिक विकासासोबातच शाळेत इतर सोयी सुविधांची गरज पुरविण्याची आवश्यकता असते. शाळा भेटी दरम्यान असे लक्षात आले की, लोकसहभागातून भौतिक सुविधांनी सुसज्ज अशी शाळा मुलांच्या विकासाला नक्कीच पूरक ठरते. शाळेची प्रत्येकच गरज शासनाच्या आर्थिक सहाय्याने पूर्ण होईलच असे नाही. सर्व भौतिक सोयी सुविधांनी सुसज्ज अशी शाळा व शाळेचे वातावरण सर्व मुलांना शिकण्यासाठी पोषक असते. शाळेतील मुख्याध्यापकांनी सर्व शिक्षकांच्या सहकार्याने पुढाकार घेउन शाळेची परिस्थिती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी कोणत्या सुविधा आवश्यक आहेत हे जर ग्रामस्थांसमोर मांडले तर काही प्रमाणात का होईना त्यांचे सहकार्य मिळविणे सोपे होते. शाळा प्रगत करण्याचे ठरविले तर नक्कीच त्याचा उपयोग होतो. फक्त आर्थिकच नव्हे तर श्रमाच्या किंवा इतर कौशल्यपूर्ण कामे जसे कुंभारकाम, लोहारकाम, शिंपीकाम, चित्रकार, टोपल्या विणणे इ. विविध कला जसे गायन, वादन, भजन म्हणणे, नृत्य, खेळ इ. मध्ये पारंगत असलेल्या गावातील लोकांची मदत घेता येते. सर्वच शिक्षकांना सर्वच कला कौशल्ये येतीलच असे नाही आणि प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये विविध सुप्त कला गुण असतात. त्यांना शिक्षणापासून वंचित न ठेवता त्यांना आवश्यक, गरजेप्रमाणे सुविधा पुरवून पुढे नेणे, प्रगत करणे हे शिक्षण विभागातील प्रत्येक घटकाचे कर्तव्य आहे. ज्या शाळांनी उत्तम लोकसहभाग मिळवून शाळेची प्रगती केली आहे असे उदाहरण व याबद्दल प्रेरणा इतर मुख्याध्यापकांना व शिक्षकांना मिळावी या उद्देशाने हा विषय घटकसंच तयार करण्यासाठी निवडण्यात आला.

**मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे -**

1. CSR / लोकसहभाग ही संकल्पना समजून घेणे.
2. प्राथमिक शाळास्तरावर CSR / लोकसहभागातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी पुरविण्यासाठी उपयोग समजून घेणे.
3. प्राथमिक शाळास्तरावर CSR /लोकसहभाग मिळवून विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी पुरविण्यासाठी उपयोग करणाऱ्या शिक्षक व मुख्याध्यापकांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.
4. प्राथमिक शाळा स्तरावर CSR / लोकसहभागामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधींची उपलब्धता होते, याबाबत शिक्षक व मुख्याध्यापकांमध्ये दृष्टिकोन विकसित करणे.

**CSR / लोकसहभाग संकल्पना -**

भारतातील कंपन्या कशा चालाव्यात याचे निकष सांगणारा कायदा म्हणजे “कंपनी ACT CSR 2013”. सन 1956 मध्ये अस्तित्वात आलेल्या या कायद्यात 2013 साली काही महत्त्वाचे बदल करण्यात आले. त्यातील एक बदल म्हणजे

SECTION 135. ज्यात भारतातील उद्योगांची सामाजिक बांधिलकी या विषयी उल्लेख आहे. सध्या जो कायदा अमलात आला आहे, त्याची पायाभरणी 2009 साली मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स MCA ने CSR संदर्भात घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वापासून सुरू झाली आणि वर्ष 2013 ला लोकसभा आणि राज्यसभेत पारित झाल्यानंतर 30 ऑगस्ट 1913 साली हे बदल कायदा म्हणून लागू झाले आहेत.CSR म्हणजे Corporate Social Responsibility याला मराठी भाषेत व्यावसायिक सामाजिक जबाबदारी असे संबोधले जाते.कंपन्यांमध्ये निसर्गातील साधनसंपत्तीचा वापर करून नफा मिळवला जातो त्याबदल्यात परतफेड करण्याची जबाबदारी असावी म्हणून सीएसआर निधीची तरतूद करण्यात आली आहे. खाजगी क्षेत्रातील कंपन्या नफ्याचा काही भाग बाजूला काढून ठेवतात व एक सामाजिक जबाबदारी म्हणून या निधीतून समाज उपयोगी कार्य करण्यात येते. कंपनी कायदा 2013 मध्ये यासंबंधी तरतूद केलेली आहे आणि खाजगी कंपनीला जमा करणे बंधनकारक आहे. सामाजिक जबाबदारी, समाजाप्रती असलेली जबाबदारी, आपण समाजाला काहीतरी देणे लागतो त्यासाठी समाजाला फायदा होईल असे कार्य केले पाहिजे. या कार्यामध्ये विविध गोष्टी केल्या जाऊ शकतात जसे गरीब मुलामुलींसाठी शिक्षण उपलब्ध करणे, पाणी, रस्ते, कपडे आणि अन्य बाबी सामान्य व्यक्तीसाठी सामाजिक जबाबदारी असते तसेच कार्पोरेट सोशल रिस्पोंसिबलिटी लागू होते.

कुठलीही कंपनी व्यवसाय करत असताना त्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम समाजावर आणि निसर्गावर होत असतो नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करत असताना निसर्गाला कमीत कमी नुकसान होईल असा प्रयत्न असला पाहिजे तसेच या बदल्यात निसर्गाला परत दिले पाहिजे.वायु प्रदूषण, जल प्रदूषण, पर्यावरणाची हानी,वृक्षतोड या गोष्टी कमी अधिक प्रमाणात होत असतात हे टाळण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.गरिबी, कुपोषण, रस्ते, पाणी, अन्न, निवारा, आरोग्य, प्राथमिक शिक्षण असे अनेक प्रश्न असतात. काही प्रश्न CSR मार्फत सोडवले जाऊ शकतात.




**प्राथमिक शाळास्तरावर विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी CSR/लोकसहभाग मिळविताना शालेय नेतृत्वासमोरील आव्हाने -**

प्राथमिक शिक्षण ही मानवाची मुलभूत गरज आहे. परंतु मागील काही काळात शिक्षण क्षेत्रात खूप मोठ्या प्रमाणात स्पर्धा निर्माण झाली.पालक वर्ग जास्तीत जास्त इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे आकर्षिला जाताना दिसत आहे. शिक्षण क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर आणि शिक्षणाच्या दर्जापेक्षाही आधुनिकतेच्या नावाखाली विद्यार्थी गणवेश, शाळेत जाण्यासाठी स्कूल बस, शाळेचे बाह्यरूप याबाबत याकडे जास्तच आकर्षित झाल्याचे दिसते.अशा स्पर्धेच्या युगात त्रोटक भौतिक सुविधा असणाऱ्या आपल्या ग्रामीण भागातील शाळासमोर अनेक आव्हाने आहेत.

**शिक्षकांशी संबंधित आव्हाने -**

शासकीय शाळेसाठी समाजाकडून आर्थिक मदत मिळविणे खूप सोपी किंवा सहज गोष्ट नाही. जि.प.च्या शाळेला शासनाकडून भरपूर अनुदान येते ही समाजाची धारणा आहे आणि ती बदलणे हे शिक्षकांसाठी एक मोठे आव्हान आहे.आपल्या गावातील शाळेत उत्तम शिक्षण मिळू शकते हा विश्वास गावकऱ्यामध्ये निर्माण करण्यासाठी शिक्षकांना गुणवत्तेच्या दृष्टीने शाळेमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन सातत्याने करणे गरजेचे असते जसे,समाज संपर्क टिकवून ठेवणे,वारंवार गृह भेटी देणे,निधी गोळा करण्यासाठी प्रयत्न करणे. सर्व कामे सांभाळून विद्यार्थ्यांची संपादणूक पातळी वाढविणे, शाळेतील पटसंख्या

टिकवून ठेवणे या साठी विविध उपक्रम, कार्यक्रमाचे आयोजन शिक्षकाला करावे लागते.लोकसहभाग अधिक वाढविण्यासाठी शिक्षकांमध्ये लोक संपर्कासाठी संवाद कौशल्य हवे, स्वत:बद्दल आत्मविश्वास असावा, आपले ध्येय प्रामाणिक व निश्चित असावे, जिद्द, चिकाटी, सातत्य असावे, रागावर नियंत्रण असावे, संयम असावा, तसेच चौकटीच्या बाहेर जाऊन काम करण्याची तयारी असावी, ही लोकसहभागाची तंत्रे मुख्याध्यापक व शिक्षकांच्या अंगी असणे आवश्यक आहे. मिळालेला लोकसहभागाचा उपयोग विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी करता येणे व जास्तीत जास्त विद्यार्थी शाळेकडे कसे आकर्षिले जातील याकडे लक्ष देणे हे शिक्षकासाठी,मुख्याध्यापकांसाठी महत्वाचे आहे.शाळेला वस्तू स्वरुपात मिळालेल्या लोक सहभागाचे उपयोगिता मूल्य टिकवून ठेवणे हे सुध्दा शिक्षक, मुख्याध्यापकांसाठी मोठ आव्हानच आहे.

### पालकांशी संबंधित आव्हाने -

गावातील लोकांच्या शाळेकडून काही अपेक्षा असतात. शाळा व्यवस्थापन समिती मधील सदस्य जास्तीत जास्त पालक असल्यामुळे आपला पाल्य ज्या शाळेत शिक्षण घेत आहे,ती शाळा सर्व भौतिक सुविधांसह गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी असावी असे त्यांना निश्चितच वाटते. आपल्या गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत सर्व सोयी सुविधासाठी आर्थिक मदत शासन देत असते असा सर्व पालकांचा समज आहे.त्यामुळे मुख्याध्यापक शिक्षकांनी पालकांना आपल्या शाळेचे महत्व पटवून देणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील पालकांची आर्थिक परिस्थिती बेताचीच असते. त्यामुळे त्यांची कितीही इच्छा असली तरी आर्थिक मदत शाळेला देऊ शकत नाही. हे पालकांसाठी आव्हानच आहे परंतु ते श्रमाच्या स्वरुपात शाळेला मदत करू शकतात जसे गावातील कारागीर उदा. कुंभार, सुतार, बांबूकाम, भरतकाम, विणकाम, चांभार, सुतकताई, टेलरकाम, शेतकरी यांची मदत शालेय विद्यार्थ्यांना विविध कौशल्य शिकविण्यासाठी करता येऊ शकते. शाळेत एखादा कार्यक्रम असेल तर स्वच्छतेचे, शाळा सजावटीचे किंवा शाळेच्या रंगरंगोटीचे काम करण्यासाठी गावातील मंडळी स्वतःहून पुढे येत असेल तर नक्कीच त्या गावात शिक्षक मुख्याध्यापक पालक सहसंबध चांगले आहेत व ते शाळेचे भविष्य उज्वल आहे असे समजावे.

### समाज संबंधित आव्हाने -

शिक्षणक्षेत्रातील खाजगीकरणामुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू झाल्या.बरेचवेळा या शाळांचा बाह्य देखावा खूप जास्त असतो. शहरात किंवा अलीकडे ग्रामीण भागातही अशा प्रकारच्या शाळांना खूप महत्व आलेले दिसून येत आहे.शाळेची इमारत, पटांगण, विद्यार्थ्यांचा पोशाख या सर्व कारणामुळे पालक आकर्षित होतात, विद्यार्थी गुणवत्तेपेक्षा टाय, बेल्ट आणि बुट घालून इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये आपला पाल्य शिकावा याकडे शहरी व ग्रामीण भागातील पालकांचा जास्त कल दिसतो. CBSE बोर्डाच्या शाळा ग्रामीण भागांपर्यंत पोहचल्या व त्या शाळांमध्ये स्पर्धा वाढताना दिसत आहे.त्या शाळांचा विद्यार्थी मिळविण्याचा आटापिटा करण्यासाठी शाळेची स्कूल बस ग्रामीण भागात पोहोचली आणि त्याचा थेट परिणाम जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थी संख्येवर झाला.प्रत्येक पालकाला आपल मुलही इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकाव असे वाटते. तसेच काही पालक सामाजिक प्रतिष्ठेसाठी, तर काही पालक आपली आर्थिक परिस्थिती चांगली आहे म्हणून, तर काही पालक आर्थिक परीस्थिती नाजूक असताना सुद्धा आपल्याला जे मिळाल नाही ते आपल्या मुलाला मिळाला पाहिजे म्हणून कष्ट करून आपल्या पाल्याला खाजगी शाळांच्या झगमगाटाला आकर्षित होऊन त्या शाळामध्ये पाठवितात. या शाळांमध्ये शिकल्यामुळे माझा पाल्य डॉक्टर, इंजीनीयर होईल किंवा मोठ्या पदावर नौकरी करेल व भरपूर पैसा कमवेल असा त्यांचा समज आहे. आपल्यासारखी मोलमजुरी करण्याची आपल्या मुलावर वेळ येऊ नये म्हणून पालक या शाळेची भरमसाठ फी भरून वेळ प्रसंगी फी साठी कर्ज घेऊन याच शाळेत शिकवितात. या शाळांमध्ये शिकण्याचे माध्यम इंग्रजी असल्यामुळे आपला पाल्य अधिक हुशार होईल असे त्यांना वाटते. समाजाची अशा प्रकारची मानसिकता असणे हे एक आव्हानच आहे.यासाठी ग्रामस्थांचे प्रबोधन करून जिल्हा परिषदेच्या शाळेत मोफत शिकून सुद्धा आपला पाल्य चांगले भविष्य घडवू शकतो हा विश्वास पालकांमध्ये निर्माण करण्याची गरज आहे.

### महाराष्ट्र शासनाचा शिक्षणासाठी CSR -

RTE कायद्यांतर्गत शैक्षणिक साहाय्य आणि साहित्य ई. साठी आर्थिक तरतूद दिली जाते.शालेय शिक्षण विभागशासन निर्णय दि.९/६/२०१४ नुसार शालेय शिक्षण विभागामार्फत CSR धोरण मांडले.कॉर्पोरेट कंपन्या सचिवांशी संपर्क साधू शकतात.राज्यस्तरावर शालेय शिक्षण विभाग , आयुक्त शिक्षण, पुणे, किंवा यासाठी जिल्हा स्तरावरील संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आवश्यकतेनुसार CSRप्रक्रियेवर सल्लामसलत करू शकतात. र जिल्हा स्तराव . शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी जबाबदार असलेले जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांचे प्राचार्य, यासाठी नोडल

अधिकारी म्हणूनही काम करतात.जिल्ह्यातील शैक्षणिक उपक्रमांना समर्थन देण्यासाठी शासनाने खालील क्षेत्रे निवडली आहेत ज्यांना CSR समर्थन आवश्यक आहे.

- शाळा, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सुविधा यासह पायाभूत सुविधा,संरक्षक भिंत, रॅम्प, विजेसाठी सोलर पॅनल, मुलींसाठी वसतिगृहे, हात धुण्याची केंद्रे आणि वॉटर प्युरिफायर उभारणे.
- वीज बिलांची थकबाकी भरणे, इंटरनेट कनेक्टिव्हिटी प्रदान करणे,
- स्वयंपाकघर अपग्रेड करणे, गॅस कनेक्शन, भांडी, धान्य साठवणुकीसाठी डबे, गॅस प्रदान करणे ,किचन गार्डन विकसित करणे, अग्निशामक उपकरणे प्रदान करणे, सॅनिटरी नॅपकिन्स आणि इन्सेमिनेटर.
- ICT - डिजिटल शाळांसाठी संगणक, प्रोजेक्टर, टॅब्लेट किंवा इतर उपकरणे आणि ऑनलाइन प्रशिक्षण, डिजिटल सामग्री विकसित करणे.
- विशेषशैक्षणिक : स्वयंसेवक कार्यक्रम.अनौपचारिक क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक प्रशिक्षणाची सोय करणे : सहाय्य, शिक्षण वाढीसाठी, शैक्षणिक उपक्रम, जीवन कौशल्य शिक्षण, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, अभ्यास दौरा,क्षेत्र भेटी
- शाळांमध्ये ट्विनिंग.भागीदारी प्रस्थापित करणे
- विभागाला तांत्रिक सहाय्य प्रदान करणे.

**राज्यात पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी शासनासोबत खालीलप्रमाणे काही महत्त्वाचे सामंजस्य करार झाले आहेत -**

- ब्रिटिश कौन्सिल -100 शाळांमध्ये शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम, इंग्रजी भाषेसाठी क्षमता वाढवणे
- लेंड अ हँड इंडिया - व्यावसायिक प्रशिक्षण आणि तांत्रिक समर्थनासाठी
- Edelgive Foundation शिकण्याचे परिणाम सुधारणे, तांत्रिक समर्थन.
- स्वदेश फाउंडेशन - शाळांचे समग्र परिवर्तन.
- रोटरी क्लब - डिजिटल वर्गखोल्या उभारणे
- Leadership For Equity- सल्लागार गट.
- परभणी आणि नंदुरबार जिल्ह्यात ज्ञानप्रकाश फाऊंडेशनच्या 'लर्निंग नेव्हिगेटर'चा वापर
- शिक्षण परिषद - ज्ञान प्रकाश फाउंडेशन तर्फे केंद्रस्तरावर केंद्रप्रमुखांचे नेतृत्व आणि क्षमता विकसित करणे.
- UNICEF द्वारे आदिवासी आश्रमशाळांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर मुलांना जीवन कौशल्य प्रशिक्षण देणे.
- स्वयंसेवी उपक्रम/कार्यक्रम – शाळेत शिक्षणाची व्यापक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सर्जनशील अभिव्यक्ती आणि अध्ययन समर्थनासाठी शिक्षण .
- कुमठेबीट, सातारा येथे पाठ्यपुस्तकांशिवाय शिकवणे विशेषत: इयत्ता पहिली आणि दुसरी  मध्ये, हा पथदर्शी अभ्यास यशस्वीरित्या प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आला.
- अध्ययन  निष्पत्ती साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या कमी किमतीच्या मूल्यांकनासाठी (चाचण्या) तांत्रिक सहाय्य प्रदान करणे.
- स्वयंरोजगारासाठी व्यावसायिक शिक्षण.
- पुणे जिल्हा परिषद तर्फे - विशेषत: पाठ्यपुस्तकांचे ओझे कमी करणे यासाठी पुणे जिल्ह्यात 'एक पुस्तक एक वही' प्रयोग.
- शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी आणि स्वयं-शिक्षणासाठी ऑनलाइन अभ्यासक्रम तयार करणे.
- खान अकादमीच्या धर्तीवर उच्च दर्जाची डिजिटल सामग्री विकसित करण्यास समर्थन.
- शिक्षकांचे प्रशिक्षण नीड्स असेसमेंट - TNA
- पायाभूत सुविधांचे मॅपिंग आणि डेटा विश्लेषण.
- डिजिटल तंत्रज्ञान/उपकरणे/प्लॅटफॉर्म/व्हर्च्युअल क्लासरूम प्रदान करणे.
- शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे डिजिटल पद्धतीने सनियंत्रण करणे.
- यापैकी अनेक सुविधा महाराष्ट्राचे परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्स -PGI सुधारण्यास आणि शैक्षणिक क्षेत्रात लक्षणीय प्रगती व अधिकाधिक प्रोत्साहन देण्यासाठी मदत करेल अशी आशा आहे.

मुख्याध्यापक व शिक्षक विद्यार्थ्यांसाठी शालेय स्तरावर विविध सहशालेय कार्यक्रम, उपक्रम राबवीत असतात. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शाळेत सर्व भौतिक सोयी सुविधा असाव्यात असे त्यांना वाटते. जसे शालेय सुसज्ज इमारत, ग्रंथालय,इंटरनेट सुविधेसह संगणक, प्रोजेक्टर, क्रीडांगण, विविध खेळाचे साहित्य, विज्ञान-गणित प्रयोगशाळा, कला-कार्यानुभव साहित्य, बोलक्या भिंती, पोषण आहारासाठी स्वतंत्र जागा,विविध विषयांचे शैक्षणिक साहित्य असल्यास विद्यार्थ्यांना शिकण्यास अधिक वाव मिळतो. विविध तंत्रे आणि कौशल्यांचा उपयोग करून विद्यार्थ्यांना शालेय विषयांचे, स्पर्धा परीक्षांचे (शिष्यवृत्ती परीक्षा) मार्गदर्शन करीत असतात. शाळेत नवनवीन प्रयोग करण्यासाठी विद्यार्थी, पालक, सर्व शिक्षक तसेच समाज यांचे सहकार्य मुख्याध्यापकांना असणे गरजेचे असते. तंत्रज्ञानाचे साहित्य व साधनांच्या उपलब्धतेशिवाय पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाऊन शिक्षण देणे शक्य होत नाही. अशावेळी समाज सहभागातून साधने उपलब्ध करून शिक्षण देण्याचे अतिशय महत्त्वपूर्ण काम शाळा शाळांमध्ये झालेले आहे, इतर भौतिक सोयी सुविधा समाज सहभागातून मिळवून विद्यार्थ्यांना प्रसन्न शैक्षणिक वातावरण उपलब्ध झाले आहे. अशावेळी मुख्याध्यापकांनी, शिक्षकांनी केलेले काम व त्यांचे अनुभव याची माहिती घेणे निश्चितच उपयुक्त ठरेल.

**यशोगाथा**
**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा**
**नांदे, ता.मुळशी जि.पुणे**




श्री. शिवाजी दत्तू सोनवणे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नांदे ता.मुळशी जि.पुणे येथे पदवीधर शिक्षक म्हणून रुजू झाले. शाळेच्या भौतिक सुविधांची वानवाच होती.वर्ग खोल्यांच्या बांधकामाबाबत पूर्व नियोजन नसल्याने इमारत विभागलेल्या स्थितीत होती. मुख्याध्यापकांच्या मदतीने त्यांनी पाचव्याच दिवशी सर्व सहकारी शिक्षकांची मिटिंग घेतली व त्यात शाळा आयएसओ करणे बाबत चर्चा केली, त्या चर्चेतून असे लक्षात आले की, गावातील लोकांचा सहभाग मिळत नाही. शाळे बद्दल लोकांमध्ये उदासिनता आहे. पालक सभेला पालकांचा फारसा प्रतिसाद नसल्याचे समजले. मुख्याध्यापकांच्या सहकार्याने गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य काही प्रतिष्ठित व्यक्तिच्या सर्वांची सहविचार सभा घेण्यात आली. त्यात शाळेच्या भौतिक सोयीसुविधाविषयी चर्चा केली, सध्याची शाळेची वास्तव परिस्थिती निदर्शनास आणून दिली. मुलांना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, चांगले शैक्षणिक वातावरण निर्माण केले पाहिजे अशा विचारांच्या क्रांतीची ठिणगी टाकून गावकऱ्यांच्या डोक्यात विचारांचे काहूर निर्माण होईल एवढे नक्कीच पेरले होते. जास्तीत जास्त लोकापर्यंत डिजिटल शाळेचे व्हिजन पोहोचवण्याचा जणू सरांनी चंगच बांधला होता. विकास करायचा असेल तर विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षणाने सक्षम नागरिक घडविले पाहिजे, त्यासाठी आपली शाळा कशी असेल याबाबतची ब्ल्युप्रिंटच ग्रामस्थांसमोर मांडली. ती म्हणजे शाळेची इमारत भविष्यात तीन मजली असेल, संगणक लॅब, सायन्स लॅब, वाचनालय असेल, शाळा आयएसओ झालेली असेल, मुलामुलीसाठी स्वतंत्र शौचालय असेल, अध्ययन-

अध्यापनात आधुनिक तंत्रज्ञानाच्या सुविधा असतील, गावाला शाळेचे भूषण वाटावे व शाळेला गावाचा आधार वाटावा अशी शाळा भविष्यात तयार करण्यासंबधीची माहिती सांगितली. हायटेक शाळा बनविण्याचे स्वप्न गावाला दाखविले. यानंतर सोनवणे सर कामाला लागले. शाळेच्या गरजा कोणत्या त्या कामांची यादी तयार करणे. त्यातील कमी खर्चाचे काम कोणते? जास्त निधी लागणारे काम कोणते? अशा प्रकारे सविस्तर अशी यादी तयार केली. शाळेच्या खात्यावर किती निधी उपलब्ध आहे त्याचा अंदाज घेतला. त्यानुसार उपलब्ध निधीतून कोणकोणती कामं करता येतील याचा अंदाज घेतला, त्यात सदर शालेय निधीतून रंगकाम, बेंच दुरूस्ती करण्याचे काम पहिल्या टप्प्यात करण्याचे ठरविले. दरम्यानच्या काळात एक वेगळीच जबाबदारी श्री. सोनवणे सरांकडे आली ती म्हणजे बीएलओचे काम व मतदान पुनरिक्षण, सरांनी या कामाकडे एक संधी म्हणून बघितले. त्याचा त्यांना समाज संपर्कासाठी खूपच फायदा झाला. गावाचा परिसर मोठा होता रविवारच्या सुट्टीच्या दिवशी वर्गातील मुलांच्या मदतीने गावाची व शिवाराची, गल्लीमोहल्ल्यांची माहिती करून घेतली. गावातील प्रतिष्ठित व्यक्तींची ओळख झाली. सोबतच शाळेच्या विकासाबाबत चर्चा करू लागले. नियोजनानुसार कामासाठी गावकऱ्यांकडून काय मदत मिळू शकेल हे समोर ठेवले त्यामुळे त्यांच्याकडून आश्वासन मिळविणे सोपे झाले. अनेक व्यक्तींशी ओळख झाल्यामुळे सुट्टीच्या कालावधीत सदर व्यक्ति अधून मधून भेटू लागल्या. यादीत घेतलेल्या फोन नंबरवरून संपर्क करू लागले .लवकरच दिवाळीची सुट्टी लागणार होती. बांधकामासाठी तालुकास्तर व जिल्हास्तर प्रशासनाकडे परवानगीसाठी अर्ज व आवश्यक बाबींची पूर्तता केली होती. तसेच दुरुस्तीसाठी लागणाऱ्या सामानाची जुळवा जुळव केली. सिमेंट, विटा, वाळू, खडी, रंगकामाचे साहित्य शाळेच्या आवारात उतरून घेतले . दुरूस्ती, रंगकाम आणि सायन्सलॅब, संगणकलॅब, इलेक्ट्रिकलकाम, प्रत्येक वर्गात प्रोजेक्टर इत्यादी सर्व काम करण्यास वेगाने सुरुवात झाली. तसेच गावातील काही तरुण आणि पदाधिकारी सरांच्या सोबतीला असायचे. याचा परिणाम असा झाला की शाळेत काय चालल म्हणून काही ग्रामस्थ बघायला येऊ लागले. जे लोकशाळेत कधी ही फिरकत नव्हते असे लोक शाळेत येऊ लागली. आणि वेगाने लोकचळवळ वाढू लागली आणि बघताबघता शाळेच काम वेगाने होऊ लागले. पहिल्या टप्प्याचे काम 2 महिन्यात पूर्ण करून 84 लाख रुपयापर्यंत निधी वस्तूरूपाने उभा राहिला आणि शाळा आयएसओ झाली. मुळशी तालुक्यातील इ.1 ली ते 7 वीची पहिली शाळा आयएसओ झाली. शाळेच रूपच पालटलं, अनेक सोयीसुविधा मिळाल्या. अवघ्या 4 ते 5 महिन्यात शाळेचे काम पूर्ण झाले पुढील काम चालूच होते. गावातील मृतव्यक्तींच्या स्मरणार्थ तर कोणाच्या वाढदिवसाच्या निमित्त शाळेचा एक मजला बांधून देणे, शाळेसाठीचा, कल्चरल हॉल, कॉन्फरन्स रूम, कार्यालय, प्रत्येक मजल्यावर शौचालय, शाळेच्या आवारात पाण्यासाठी कूपनलिका इत्यादी कामांसाठी गावकऱ्यांनी मदत केली, अशा विविध कामाची जबाबदारी वाटून साधारण 1.वर्ष 6 महिन्याच्या कालावधीत शाळेचे काम पूर्ण करून घेतले. त्यासाठी अनेक लहान मोठ्या कामांसाठी गावातील अनेक पालक व ग्रामस्थांची याकामात मदत झाली. लोकसहभागातून साधारण अडीच कोटी व त्यापेक्षा अधिक निधी वस्तूरूपाने मिळवून शाळेत आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयी सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत.

1. प्रत्येक मजल्यावर स्वच्छ शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय केली
2. प्रत्येक मजल्यावर मुलामुलीसाठी स्वतंत्र लक्झारियस शौचालय व्यवस्था निर्माण केली
3. प्रत्येक वर्गात प्रोजेक्टर, ई–लर्निंग सुविधा, इंटरनेटसुविधा, दूरदर्शन दाखविण्याची सुविधा.
4. प्रत्येक वर्गात वायरलेस साऊंड सिस्टम.
5. प्रत्येक वर्गासह शाळेचा संपूर्ण परिसर 24 सीसीटीव्ही कॅमेराद्वारे सुरक्षित केलेला आहे.
6. रिमोटलर्निंग, ग्लोबल क्लासरूम, व्हर्चुयल क्लासरूम
7. Active fun learn English, Math, Craft, Music
8. सेमी इंग्लिश वर्ग इ १ ली पासून सुरू केला.
9. 50 संगणकाची ग्लास फिटिंग सह वातानुकूलित लॅब प्रशस्त लॅब.
10. स्वतंत्र वाचनालय, स्वतंत्र सायन्सलॅब
11. कॉन्फरन्स रूम ई – लर्निंग सुविधेसह
12. कराटे,मल्लखांब,रोपखांब, स्विमिंग,धंनुर्विद्या,नेमबाजी,रायफलशूटिंग, स्केटिंगची सुविधा
13. शाळेसाठी स्वतंत्र सफाई कर्मचारी, 24 तास वॉचमन, यासह अनेक सुविधा तयार केल्या आहेत.




जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नांदे येथे सद्यस्थितीत नर्सरी, लहान गट, मोठा गट तसेच इयता 1 ली ते 10 वी पर्यन्त चे वर्ग आहेत. शाळा व्यवस्थापन समिती व ग्राम पंचायत नांदे आणि पंचायत समिती मुळशी व जिल्हा परिषद पुणे या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून कायम विना अनुदानित तत्वावर शाळेस शासनाकडून मान्यता घेण्यासाठी त्यासंबधी लागणारे माध्यमिक साठीच्या तीन शिक्षकांचे पगार व पूर्वप्राथमिक शिक्षणासाठीच्या शिक्षकांसाठीचे पगार राजमाता संस्कार प्रतिष्ठान नांदे आणि गावातील व परिसरातील इतर स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून केला जातो.असे अनेक उपक्रम व विविध सोयी सुविधा निर्माण केल्या आहेत. त्याचा फायदा असा झाला की,

1) शाळेची पट संख्या १६९ वरून ६५० पर्यन्त वाढली.
2) मुलांच्या उपस्थितीचे प्रमाण वाढले.
3) मुलींचे गळतीचे प्रमाण थांबले.
4) ग्रामस्थांना शाळेबद्दल आवड व अभिमान वाटू लागला.
5) अनेक मान्यवरांच्या शाळेला भेटी झाल्या. तालुक्यातील व इतर तालुक्यातील शिक्षकांच्या शाळेला भेटी झाल्या व त्यामुळे त्यांनी लोकसहभाग व शाळा आयएसओ करणे संबंधी प्रेरणा घेतली. व अनेक मान्यवरानी लोकसहभागाचे कौतुक केले.
6) वर्तमानपत्रातून व समाजातून शिक्षकांचे, सरपंच, ग्रामस्थांचे कौतुक होऊ लागले.
7) मुख्याध्यापक तसेच शिक्षक गावचा व शाळेचा कसा कायापालट करू शकतो याची अनुभूति ग्रामस्थांना आली
8) 3.50 कोटीचा निधी वस्तु रूपाने उभारून असे भरीव कार्य होऊ शकले.
9) महाराष्ट्र शासनाकडून जिल्हा परिषद शाळेला आंतरराष्ट्रीय शाळेचा दर्जा प्राप्त झाला. त्यानंतर विद्यमान शासनाकडून सदर शाळा राज्यातील मॉडेल स्कूल शाळांच्या प्रतवारीत निवड झाली आहे.



नांदे शाळेसारख्या जास्तीत जास्त शाळा निर्माण करण्याचे उद्दीष्ट महाराष्ट्र शासनाने ठेवले असून त्या धरतीवर कामकाज चालू केले आहे. अशा प्रकारे एक पथदर्शक आदर्श शाळा लोकसहभागातून निर्माण करण्याचा प्रयत्न सरांनी केला. विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळेत निशुल्क व दर्जेदार शिक्षण मिळावे तसेच शिक्षणाने त्यांना सक्षमकरण्यासाठीचे निर्मळ उद्दीष्ट डोळयासमोर ठेऊन काम करण्याचा प्रामाणिक प्रयत्न सरांनी केला.त्यासाठी स्वत:ला झोकून देऊन ते काम करत राहिले. ज्या शाळेची वर्ग खोल्याची अवस्था अत्यंत दयनीय होती त्या शाळेला दीड वर्षात आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा उभी करता आली. अशी भव्यदिव्य तीनमजली इमारत दिमाखात उभी आहे. अशा प्रकारे शाळेचा आमुलाग्र बदल होईल असे ग्रामस्थांना वाटत नव्हतं किंबहुना त्यांनी अशी कल्पना सुद्धा केली नसेल अशी शाळा तयार झाली आहे. लोकांचा विश्वास संपादन करून व एक चांगले उद्दीष्ट घेऊन जेव्हा एखादे काम हाती घेतो तेव्हा अनेक मदतीचे हात पुढे येतात फक्त आपण त्यांच्यापर्यन्त गेले पाहिजे, त्यांच्यापर्यन्त पोहोचले तरच अशक्य काम शक्य झाल्याशिवाय राहत नाही. थोडक्यात चाकोरीच्या बाहेर जाऊन काम करणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त शाळामध्ये अशा प्रकारचा लोकसहभाग वाढून दर्जेदार शाळा नक्कीच निर्माण होतील यात शंका नाही. त्याही जिल्हा परिषदांच्या असतील. लोकसहभागाचा नांदे पॅटर्न राबवून ज्याच्यामुळे अशा प्रकारे शाळेत व शिक्षणात आमुलाग्र बदल घडवणे शक्य आहे.

**चिंतनात्मक प्रश्न -**

1) श्री.सोनवणे सरांनी गावकऱ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी नेमके कोणते प्रयत्न केले?

2) श्री.सोनवणे सरांना गावकऱ्यांचे सहकार्य मिळाले नसते तर............

**यशोगाथा**
**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा**
**बेलवाडी तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद**



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेलवाडी तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद येथील श्रीमती सुनंदा निर्मले मॅडम यांनी लोकसहभागातून शाळेचा विकास कसा करता येईल यावर विचार केला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे, विद्यार्थी पालक व ग्रामस्थ यांच्यामध्ये समन्वय साधणे हा हेतू डोळयासमोर ठेवून नियोजन केले लोकसहभागातून आपली शाळा सुंदर वास्तू व सर्व भौतिक सुविधांसह सज्ज करणाऱ्या या निर्मले मॅडमच्या शाळेची कहाणी, उस्मानाबाद जिल्ह्यातील लोहारा तालुक्यातील बेलवाडी हे गाव सर्व बाजूंनी माळरान असलेल्या ठिकाणी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेलवाडी ही शाळा उभी आहे गावाला अजूनही तालुक्यातून एकही बस जात नाही. या गावाच्या विकासासाठी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक यांनी शाळेची अवस्था बदलण्याचा निर्णय घेतला व पालकांची बैठक घेतली. सर्वप्रथम गावातील सर्व ग्रामस्थ महिला बचत गट यांची बैठक बोलावली आणि या बैठकीत आपल्या गावातील शाळेची सद्यस्थिती सांगितली. पालकांसोबतचर्चा झाली. गावातील सर्वांनी पुढाकार घेऊन शाळा पूर्ण डिजिटल करण्याचे ठरवले. गावातून प्रत्येक पालकांनी जमेल तसा निधी देण्याचे ठरवले. पंधरा दिवसांमध्ये वस्तू व रोख स्वरूपात साडेतीनलाख रुपये निधी जमा झाला.या जमा

झालेल्या निधीतून सर्वप्रथम संगणक वर्ग सुरू करण्यात आला. पाच संगणक, दोन एलईडी, एक प्रोजेक्टर अशा स्वरूपात डिजिटल वर्गाची सुरुवात झाली. शाळेच्या इमारतीला बाहेरून रंग काम करण्यासाठी एक लाख एवढा निधी जमा करून रंगकाम पूर्ण केले. प्रत्येक विद्यार्थ्याला गावातील सरपंचांनी स्टडी टेबल देऊन अभ्यासाला बसण्याची सोय करून दिली. शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. गावाच्या सरपंचांनी स्वतःची एक एकर जमीन दिली. आज अनेक उपक्रम शाळेमध्ये राबविण्यात येत आहे. तालुक्यातील एक आदर्श शाळा म्हणून ही शाळा नावारूपास आली आहे. शाळेसाठी मैदान खेळाच्या क्रिडांगणाची आखणी, शैक्षणिक साहित्य, क्रीडा साहित्य या सर्व बाबी मुलांसाठी उपलब्ध केल्या आहेत. शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन झाले. या स्नेहसंमेलनातून पासष्ट हजार रुपये निधी जमा झाला. त्यामधून सर्व वर्गांचे आतून रंगकाम करण्यात आले. शाळेत वाचनालय आहे. गांडूळ खत प्रकल्प सुद्धा आहे हे सर्व शक्य झाले ते केवळ ग्रामस्थ व शालेय व्यवस्थापन समितीतील सदस्य तसेच महिला बचत गट व शाळेतील शिक्षक यांच्या सहकार्यामुळेच.कोरोनाच्या या परिस्थितीमध्ये महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी राबविलेले सर्व उपक्रम, सर्व प्रशिक्षणे, स्वाध्यायमाला, अभ्यासमाला, शिक्षकदिन, बालदिन या निमित्त सर्व स्पर्धांमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी भाग घेऊन स्वतःची गुणवत्ता दाखविली. शाळेत विविध उपक्रम घेण्यात आले. यामुळे एक वर्षापूर्वी शाळेचा ५५ असलेला शाळेचा पट आज दोन वर्षानंतर ११० पर्यंत गेलेला आहे. त्यामध्ये इंग्रजी माध्यमातून शाळेत परत आलेली २५ मुले आहेत शाळेसाठी ही बाब अभिमानास्पद आहे. तालुक्यातील उपक्रमशील शाळा म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेलवाडीचे नाव घेतले जाते.

**चिंतनात्मक प्रश्न :-**

1) श्रीमती.सुनंदा निर्मले यांनी लोकसहभागातून शाळेचा भौतिक कायापालट कसा साधला?

2) श्रीमती.सुनंदा निर्मले यांना विद्यार्थी गुणवत्ता वाढविण्यासाठी लोकसहभागाची कशी मदत झाली?

## यशोगाथा
## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा
## तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा साळवे, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे या शाळेतील शिक्षक श्री.जितेंद्र कल्याणसिंग पाटील व त्यांच्या इतर सहकारी शिक्षक यांनी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची प्रेरणा घेऊन समाज सहभागातून शाळेचा विकास करण्याचे ठरवले. स्वतः शाळेचे अंतरंग, बाह्यरंग सजवले. शाळेत ई-लर्निंग क्लास सुरू केला. इथेच त्यांचे कार्य थांबले नाही तर ग्रामस्थ, पालक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामपंचायतचे पदाधिकारी या साऱ्यांशी शाळेच्या गरजेविषयी चर्चा केली येथून खऱ्या कार्याला सुरुवात झाली. त्यांनासुद्धा शाळेच्या भविष्याबद्दल ऐकून शाळेविषयी आपुलकी वाटू लागली.कधीही शाळेकडे न फिरकणारी मंडळी शाळेकडे शाळेत येऊन आपुलकीने चौकशी करू लागले. शाळेत काही अडचण आहे का? शाळेला कशाची गरज आहे का? याविषयी चर्चा करू लागले. जिल्हा परिषद शाळा म्हणजे शासनाची शाळा अशी विचारधारा असलेले ग्रामस्थ, आता त्यांच्या विचारांची जागा **आमची शाळा, गावची शाळा** या विचारधारेने घेतलेली आहे. शाळेच्या विकासासाठी सर्व शिक्षक सर्व पालकांनी ग्रामस्थ मिळून सतत प्रयत्न करत असतात. काही दिवसांपूर्वी शाळेतील सर्व मुले जेवायला सावलीत बसू शकतील अशी व्यवस्था नव्हती, कारण शाळा खडकावर असल्यामुळे फारशी झाडे देखील लावता येत नव्हती. मात्र याची चिंता सर्वांनाच होती आणि इच्छा असेल तर मार्ग दिसतो असं म्हणतात, त्यानुसार शाळेला रुपये ६५००० खर्च करून ३० बाय ४० चे भव्य शेड तयार केले आणि सावलीचा प्रश्न मिटला.टी.बी. लुला चरीटेबल ट्रस्टफाउंडेशन, सांगली आणि शाळेला भेट द्यायला आलेले हर्षल विभांडीक धुळे यांनी प्रत्येकी २५ हजाराची मदत केली. शाळा व्यवस्थापन सदस्यांनी देखील आर्थिक व शारीरिक मेहनतीच्या स्वरूपात मदत केली. वर्ग खोल्यांच्या बाहेरच्या भिंती, संरक्षण भिंत यावर शैक्षणिक आकृत्या, चित्रे काढायचे ठरवले. गावातील काही मंडळीने याला विरोध दर्शविला, कारण बाहेरच्या बाजूने काढलेली चित्र व शैक्षणिक साहित्य लोक शेण व मातीने खराब करतील आणि आपले कष्ट आणि पैसा वाया जाईल. पण सरांना विश्वास होता आपण हे सर्व गावकऱ्यांना विश्वासात घेऊन केल्यास ते नक्कीच याला खराब करणार नाही आणि खरच दीड वर्ष झाले, उन्हामुळे रंग फिके झाले, मात्र कोणीही त्याला शेणामातीचा डाग लावलेला नाही. कारण आता शाळा शासनाची नाही तर गावाची मालमत्ता झालेली आहे.

**चिंतनात्मक प्रश्न :-**

आमची शाळा, गावची शाळा हा विश्वास गावकऱ्यामध्ये श्री.जितेंद्र पाटील सरांनी कसा निर्माण केला

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने मोड्युलची उपयुक्तता :-**

देशाच्या प्रगतीसाठी शिक्षण व्यवस्थेची भूमिका महत्त्वपूर्ण असते ही भूमिका योग्य रीतीने पार पाडण्यासाठी शिक्षणव्यवस्थेत काळानुरूप होणाऱ्या बदलांना सामावून घेण्याची क्षमता असणे आवश्यक असते. याच दृष्टीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आराखडा तयार करण्यात आला आहे. देशाची आत्मनिर्भरता, गुणवत्तापूर्ण शिक्षण, नवनिर्मितीची क्षमता आणि जागतिक क्रमवारीतील स्थान या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण देशाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. स्थानिक कौशल्य गरजांवर आधारित उदाहरणार्थ सुतारकाम, इलेक्ट्रिकचे काम, धातुकाम, कुंभार काम यासारख्या महत्त्वपूर्ण व्यवसायिक कलांचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना मिळेल व कामाची पाहणी करता येईल तसेच स्थानिक व्यवसायिक तज्ञ जसे सुतार, माळी, कुंभार, कलाकार इत्यादींच्या मार्गदर्शनाखाली व्यावसायिक विषय शिकण्याकरिता संधी शाळांमध्ये उपलब्ध करून देणे विद्यार्थी विकास साधण्यासाठी गरजेचे आहे. या धोरणाच्या तत्त्वांमध्ये शिक्षण व्यवस्थेचा उद्देश सर्वगुणसंपन्न, सर्वसमावेशक आणि समाजाच्या निर्मितीत सहभाग घेणारे कार्यक्षम आणि चांगल्या प्रकारे योगदान देणारे नागरिक तयार करणे असा आहे. ज्या संस्थेत प्रत्येक विद्यार्थ्याला आपुलकीने वागविले जाते, स्वागत केले जाते, त्यांची तिथे काळजी घेतली जाते, तिथे एक सुरक्षित व प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण असते, जिथे सर्व विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी विविध अनुभवप्रकार उपलब्ध करून देतात आणि जिथे शिकण्यासाठी चांगल्या पायाभूत सुविधा व उपयोगी संसाधने उपलब्ध असतात, ती खरी चांगली शिक्षण संस्था असते या सर्व गोष्टी साध्य करणे हे प्रत्येक शैक्षणिक संस्थेचे ध्येय असले पाहिजे. यासाठी लोकसहभागाची महत्वाची भूमिका आहे.

**CSR / लोकसहभाग वाढविण्यासाठी असेही करता येईल:-**

- गावकरी आणि शाळा यांच्यामध्ये शालेय व्यवस्थापन समिती मार्फत विश्वासाचे संबंध प्रस्थापित करणे.
- गावातील विविध कला गुण, व्यवसाय असलेल्या कारागिरांना आमंत्रित करून त्यांच्या मार्फत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.उदा. सुतार,माळी,कुंभार,लोहार,टेलरकाम व इतर कलाकार
- गावातील शाळा आपली शाळा आहे व आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमाच्या दूरच्या शाळेत पाठवण्यापेक्षा गावातील शाळेतच उत्तम दर्जाचे शिक्षण मिळते, हा विश्वास गावकऱ्यामध्ये निर्माण करणे.
- शाळेच्या परिसरातील व्यावसायिकांडून शाळेला भौतिक स्वरुपात मदत मिळविणे.उदा.संगणक,ग्रंथालयासाठी पुस्तके,पाण्याची सुविधा,इतर आवश्यक सुविधा.
- ग्रामस्थांकडून श्रमाच्या स्वरुपात लोकसहभाग मिळविणे.उदा.शाळेला रंग देणे,शाळेची स्वच्छता करणे, भिंतींवर चित्र काढणे,मुलांना मार्गदर्शन करणे.

**संदर्भ सूची :-**


1. Govt of Maharashtra CR No. TCM -2013 (162/2013/Training Policy .Implementation of Corporate Social Responsibility –CSR activities associated with School Education Dept.
2. National Education Policy 2020
3. जीवन शिक्षण,जून-जुलै 2016,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र.
4. जीवन शिक्षण,जानेवारी 2022,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र.
5. शिक्षणाच्या वाटा,मार्च 2020,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र.
6. यशदा, यशमंथन,एप्रिल-जून 2017,यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी,पुणे.
7. http://simollanghan.blogspot.com/2017/07/corporate-social-responsibility.html

8. https://alotmarathi.com/%E0%A4%B8%E0%A5%80-%E0%A4%8F%E0%A4%B8-%E0%A4%86%E0%A4%B0-csr-information-in-marathi/
9. https://youtu.be/ztxE7flz_3M
10. https://youtu.be/GBHTw6TKxJg
11. https://youtu.be/ztxE7flz_3M
12. https://youtu.be/GBHTw6TKxJg

**मोड्यूल विकसक**
श्रीमती उर्मिला हाडेकर
अधिव्याख्याता
प्रादेशिक विद्या प्राधिकरण
नागपूर

**समन्वयन**
**डॉ.ज्योती कुलकर्णी**
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद

**मार्गदर्शक**
**श्री.रमाकांत काठमोरे**
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद